| MKCL Creating a Knowledge Lit World www.mkcl.org | Subject – भुगोल | Model Answer Set – 3 |
|---|---|---|

**प्र.१ (अ) दिलेल्यापर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:**

(१) (अ) मुंबई (२) (अ) उच्चभूमीचा आहे (३) (ब) अजस्रकडा (४) (अ) २.४१%

**प्र.२ योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट (प्रदेश) | | 'ब' गट (प्राणी) | |
|---|---|---|---|
| १) | आसाम | अ) | एकशिंगी गेंडा |
| २) | वाळवंटी प्रदेश | ब) | रानटी गाढव |
| ४) | हिमालयातील बर्फाळ प्रदेश | क) | हिमचित्ते |
| ४) | द्विपकल्पीय प्रदेश | ड) | जिराफ |

**प्र.३ एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)**

१) भारत हा आशिया खंडातील देश आहे.
२) भारतात ७ केंद्रशासित प्रदेश आहे.
३) ब्राझीलच्या मध्य भागात जास्त पाऊस पडतो.
४) सन १९७२ साली ब्राझील व भारत या दोन्ही देशांतील पहिली जनगणना साली झाली?
५) भारतातील नागरीकरणाचा कल २०११ साली ३१.२% होता.

**प्र.४ (अ) दोन्हीं देशांतील स्थान, विस्तार व हवामान स्थिती लक्षात घेऊन पुढील तकत्यात ऋतूप्रमाणे महिने वहीत लिहा. (कोणतेही दोन ऋतू)**

| ऋतू | भारत | ब्राझील |
|---|---|---|
| उन्हाळा | मार्च ते मे | जानेवारी ते मार्च |
| हिवाळा | ऑक्टोंबर ते जानेवारी | जुलै ते सप्टेंबर |
| पावसाळा | जुन ते सप्टेंबर | नौव्हेंबर ते मे |

**(ब) दिलेल्या नकाशाचे वाचन करुन विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही चार)**

१) नकाशात एकूण चार काल विभाग केलेले आहेत.
२) हे विभाग ब्राझीलच्या प्रमाणवेळ आहेत. हे विभाग ब्राझीलची प्रमाण वेळ व ग्रीनिच ची प्रमाणवेळ यांच्यातील फरक दर्शवतात.
३) जागतिक प्रमाणवेळेच्या मागे म्हणजेच ग्रीनिच वर केव्हा १२ वाजत असतात तेव्हा ब्राझीलमध्ये सकाळचे १० वाजत असतात. कारण ब्राझील हा ग्रीबिच पश्चिम भागात आहे म्हणून तेथे सूर्योदय ग्रीनिच नंतर होतो.
४) ब्राझीलमध्ये पूर्वेकडील भागातील वेळ इतर विभागांपेक्षा पुढे आहे.
५) ही वेळ इतर विभागांपेक्षा १ तास, २ तास ३ तास म्हणजे ६० मिनिटे, १२० मिनिटे आणि १८० मिनिटे पुढे आहे.
६) लाल रंगाची ठळक रेषा ब्राझीलची अधिकृत प्रमाणवेळ (BRT)

**प्र.५ खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन)**

१) अ) भारतात विविध धर्माचे, भाषा व विविध चालीरिती व परंपरा पाळणारे लोक असूनही ते सर्व भारतीय आहेत.
ब) प्रदेशाच्या भौगोलिक जडण-घडण कशीही असली तरी समान संस्कृतीचा वारसा आहे.
क) परकीय आक्रमकांनी वेळोवेळी आघात केले तरी देशाची एकता संस्कृतिक बंधनामुळे टिकून आहे.
ड) सांस्कृतिक देणगीतून मिळालेल्या गुणांमुळे भारतात विविध धर्माचे, विविध भाषा बोलणारे, विविध व्यवसाय करणारे लोक गुण्यागोविंदाने नांदतात.

२) अ) भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पूर्व घाट आहे.
ब) पूर्व किनारा या नदयांच्या संचयनाने बनला आहे.
क) गोदावरी, कृष्णा, कावेरी, महानदया यांसारख्या नदया या किनाऱ्यावरून बंगालच्या उपसागराला मिळतात.
ड) या किनाऱ्यावर गाळाचे निक्षेपण जास्त आहे त्यामुळे किनारा उथळ आहे.
इ) किनारा दंतूर नसेल तर तेथे नैसर्गिक बंदरे जास्त नसतात. म्हणून भारताच्या पूर्व किनाऱ्यावर नैसर्गिक बंदरे कमी

आहेत.

३) अ) ब्राझीलच्या उत्तर भागातून विषुववृत्त जाते.

ब) ब्राझील हा उष्ण कटिबंधातील देश आहे. त्यामुळे वर्षभर तापमान जास्त असते.

क) विषुववृत्तीय प्रदेशात तापमानात फार फरक होत नाही. म्हणून ब्राझीलमध्ये नियमित हिम वर्षाव होत नाही.

४) अ) ब्राझीलच्या भूरचनेमुळे ब्राझीलच्या पर्जन्यावर फरक पडतो.

ब) ब्राझीलचा उत्तरेकडील बहुतांश भाग हा विषुववृत्तीय प्रदेशात येतो.

क) विषुवृत्तीय प्रदेशात बहुतांश भागात त्यामुळे तेथे भरपूर पाऊस पडतो. त्यामुळे ब्राझीलचा उत्तरेकडील भाग घनदाट वनांनी व्यापला आहे.

**प्र.६ अ) दोन्हीदेशांतीलविविधक्षेत्रांतीलमालकीबाबतचातक्ता खाली दिला आहे. ब्राझीलप्रमाणे भारतासंदर्भात माहिती भरा व तक्ता पूर्ण करा.**

| **भारत** | **क्षेत्र विभाग** | **ब्राझील** |
|---|---|---|
| खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही | बँकांचा व्यवसाय | खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही |
| सार्वजनिक | रेल्वे | खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही |
| खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही | विमान वाहतूक | खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही |
| खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही | विद्युत निर्मिती | मुख्यत्वे सार्वजनिक |
| खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही | लोह आणि पोलाद उद्योग | मुख्यत्वे सार्वजनिक |
| खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही | आरोग्य | खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही |
| सार्वजनिक काही खाजगी | शिक्षण | मुख्यत्वे सार्वजनिक काही खाजगी |
| खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही | दूरसंचार | खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही |

**किंवा**

**आ)खालील तक्त्यात ब्राझील व भारतामधील नागरीकरणाची टक्केवारी दिली आहे. ही सांखिकीय माहिती वापरून स्तंभालेख तयार करा. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) २०११ (९४० पेक्षा जास्त लिंगगुणोत्तर आहे)

२) १९९१ (९३० पेक्षा कमी लिंगगुणोत्तर आहे)

३) ९४१  लिंगगुणोत्तर होता.

४) कुठल्याच वर्षी नाही.

५) कुठल्याही वर्षी लिंगगुणोत्तर १००० पेक्षा जास्त नाही. आणि ९०० पेक्षा कमीही नाही. लिंगगुणोत्तर हे कुठल्याही वर्षी स्थिर नाही.

**प्र.७ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) १) भारताला १९४७ साली स्वातंत्र मिळाले. स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या वीस वर्षात तीन युद्धांना सामोरे जावे लागले.

२) अनेक भागांतील दुष्काळी परिस्थितीला तोंड दयावे लागेल.

३) ब्राझील हा देश तीन शतकांपेक्षा अधिक काळ पोर्तुगीजांच्या अधिपत्याखाली होता. ७ सप्टेंबर १८२२ साली स्वातंत्र्य मिळाले. १९३० पासून १९८५ पर्यंत अर्ध्या शतकापेक्षा जास्त काळ हा देश लोकप्रिय लष्करी राजवटीखाली होता.

४) ब्राझील या देशाला विसाव्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात जागतिक वित्तीय समस्येला सामोरे जावे लागले व त्यातून हा देश सावरला.

२) १) एखाद्या मर्यादित भूदृश्याचा प्रत्यक्ष निरीक्षणाने केलेला अभ्यास म्हणजे 'क्षेत्र अभ्यास' होय.

२) आपण जेथे राहतो त्याच्या लगतच्या परिसरास प्रत्यक्ष भेट देऊन तेथील प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांचे निरीक्षण करणे, तसेच सर्वेक्षणाद्वारे संकलित केलेल्या माहितीच्या आधारे त्या क्षेत्राचा अहवाल तयार करणे हे क्षेत्र अभ्यासात अपेक्षित आहे.

३) आपण विविध भूरुपे, राष्ट्रीय उदयाने, वनक्षेत्र, अभयारण्ये नदया प्रकल्प, सरोवरे, कारखाने, मृदा, खनिजे इत्यादी नैसर्गिक घटकांची तसेच व्यवसाय, वाहतूक व संदेशवहन इत्यादी सांस्कृतिक घटकांचीही माहिती क्षेत्र अभ्यासाने मिळवू शकतो.

३) **भारत:**

१) भारताच्या प्राकृतिक रचनेत विविधता आढळते.

२) हिमालयाच्या उंच रांगा, दख्खनचे पठार व गंगेचे विस्तार्ण मैदान यांच्या ठळक वैशिष्ट्यांनी या भूप्रदेशाला वेगळे भौगोलिक स्वरुप प्राप्त झाले आहे.

३) उंची, उतार, खडकांचे प्रकार या बाबतीत खूपच विविधता भारताच्या प्राकृतिक रचनेत आढळते.

४) भारताचा पश्चिम किनारा अरबी समुद्राला लागून आहे तर पूर्व किनारा बंगालच्या उपसागराला लागून आहे.

५) अरबी समुद्र व बंगालचा उपसागर यांना प्रत्येकी एक मोठा द्वीपसमूह आहे. अरबी समुद्रातील समूहास लक्षद्वीप बेटे बंगालच्या उपसागरातील बेटे अंदमान-निकोबार द्वीपसमूह या नावाने ओळखली जातात.

निर्मितीनुसार भारताच्या प्राकृतिक रचनेचे पुढील भाग पडतात :-

अ) भारतीय पठारी प्रदेश ब) उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश क) उत्तर भारतीय मैदानी प्रदेश

ड) किनारी मैदानी प्रदेश इ) भारतीय बेटे

**ब्राझील :**

१) ब्राझीलचा बराचसा भाग उच्चभूमी पठारे व लहान लहान पर्वतांनी व्यापला आहे.

२) ब्राझील मध्ये अती उंच पर्वत रांग नाही.

३) ब्राझीलमध्ये किनारी मैदानाचाही अभाव आढळतो.

४) ब्राझीलच्या किनारी भागातही मैदाने विस्तार्ण नाहीत.

५) उत्तर किनाऱ्यावर ॲमेझॉनसह अनेक नद्या येऊन मिळतात. त्यामुळे हा किनारा सखल बनला आहे. येथे माराजॉ बेटे तयार झाली आहेत. पूर्वेकडील किनाऱ्यावर अनेक लहान नद्या येऊन मिळतात. या किनाऱ्यावर लांबवर पसरलेल्या पुळणी व तटीय वालुकागिरी ठिकठिकाणी दिसतात.

६) मैदानी प्रदेश दोन विभागात दिसून येतो –

(अ) ॲमेझॉन खोऱ्याचा भाग (ब) नैऋत्येकडील पॅराग्वे पॅराना नद्यांचा भाग

७) ब्राझीलचे प्राकृतिक भाग पुढीलप्रमाणे:

अ) उच्चभूमी (ब) अजस्त्र कडा (क) किनारी प्रदेश (ड) मैदानी प्रदेश (इ) द्वीपसमूह

८) ब्राझीलमध्ये किनारी बेटे व सागरी बेटे असे द्वीसमूहांचे वर्गीकरण केले आहे. किनारी बेटे ही संचयनातून निर्माण झाली आहे तर सागरी बेटे ही मुख्य भूमीतून निर्माण झालेली आहे.

४) १) भारतात दक्षिणेकडून उत्तरेकडे जाताना वातावरणात वेगळेगळया प्रकारचा बदल आपणांस जाणवतो.

२) भारताच्या दक्षिण भागात तापमान जास्त असते.

३) नैऋत्य मान्सून वाऱ्यांमुळे भारताच्या मूख्या भूमीवर पाऊस पडतो.

४) पूर्व आणि पश्चिम घाटांच्या अडथळयांमुळे किनारपट्टीवर जास्त पाऊस पडतो.

५) घाटाच्या वातविन्मुख प्रदेशात हा पाऊस कमी पडतो.

६) हे वारे अरवली पर्वताच्या समांतर वाहतात, त्यामुळे गुजरात-राजस्थानमध्ये कमी पाऊस पडतो.

७) हे वारे पुढे हिमालयाकडे वाहतात. त्यांची बाह्यधारण शक्ती वाढते. हिमालयाच्या तटबंदीमुळे येथे प्रतिरोधक पर्जन्य पडतो.

८) ईशान्येकडून हिंदी महासागराकडे हे वारे परतताना द्विपकल्पाच्या काही भागात पर्जन्य देतात.

*This question paper is for practice purpose only.